http://maharashtratimes.indiatimes.com/cms.dll/html/uncomp/articleshow?msid=६६१८४

# जाहिराचा आक्रोश

अयोध्येचा तिढा सोडविण्यासाठी शंकराचार्यांनी केलेली शिष्टाई अयशस्वी ठरल्यामुळे संघपरिवारात जल्लोषाचे वातावरण आहे. शंकराचार्यांमागे पंतप्रधान वाजपेयी असल्यामुळे विश्व हिंदू परिषदेने त्यांचाच राजीनामा मागितला होता.

आता वाटाघाटी फसल्यामुळे वाजपेयींना राजीनामा देण्याचेही कारण नाही. शिवाय अयोध्येचा प्रश्न सुटला, तर वाजपेयींचे काय होईल, यापेक्षा संघपरिवारातील लोकांना काहीच काम उरणार नाही, हे लक्षात घेतले पाहिजे. रा. स्व. संघ ही शिखर संघटना असली, तरी या परिवारातील विहिंप आज जास्त शक्तिमान पोटसंघटना बनली आहे. मध्य प्रदेश, राजस्थान आणि दिल्लीत त्रिशूलवाटपात विहिंपच आघाडीवर होती आणि त्यापूवीर् गुजरातमध्ये पद्धतशीरपणे मुस्लिमांचे शिरकाण झाले, तेव्हाही विहिंपचे कार्यकतेर् अधिक सक्रिय होते.

या जातीय दंग्यांचा आधार घेत भारतीय जनता पक्षाने यश मिळविले, तेव्हा 'मोदीत्वाचा विजय झाला,' अशा गर्जना करण्यात आल्या. ज्या ज्या भागांत दंगे झाले, तेथे तेथे भाजपने पूवीर्पेक्षा जास्त यश संपादन केले. भाजपचे मतदार म्हणून ओळखल्या न जाणाऱ्यांनीही पक्षाला भरभरून मते दिली. दंगलींमुळे गुजरातचीच हिंदू-मुस्लिम अशी फाळणी झाली आणि त्याचा पक्षाला लाभ मिळाला. परिणामी ज्या लोकांनी दंग्यांत भाग घेतला, त्यांचे संरक्षण करणे हे नरेंद मोदी सरकारला आपले कर्तव्यच आहे, असे वाटू लागले.

त्यामुळे तपासकार्य धीम्या गतीने करणे, पुरावे नष्ट करणे, 'अन्य प्रकरणांत गुंतवू' अशा धमक्या देऊन साक्षीदारांना फितविणे, हे प्रकार सुरू झाले. चौकशीसाठी जो आयोग नेमण्यात आला होता, त्याच्याच धुरिणांनी चौकशी पूर्ण होण्यापूवीर्च संशयास्पद विधाने करण्यास सुरुवात केली. गोध्रा प्रकरणातील मुख्य आरोपींना रास्तपणे तातडीने अटक होते, त्यांच्यावर खटले भरले जातात आणि गुजरात दंगलींमधील आरोपींची मात्र पुराव्याअभावी निदोर्ष सुटका होते, यामुळे सर्वसामान्यांच्या मनात काही प्रश्न उभे राहिले, तर त्यांना दोष देता येत नाही.

आता 'बडोद्यातील बेस्ट बेकरी हत्याकांडाच्या खटल्यामध्ये मला जबानी बदलण्यासाठी जिवे मारण्याची धमकी देण्यात आली होती,' असा सनसनाटी आरोप या घटनेत होरपळलेल्या कुटुंबातील साक्षीदार आणि खटल्यातील मुख्य तक्रारदार जाहिरा शेख यांनी केला असून, त्यामुळे या शंकांना बळकटीच आली आहे. विशेष म्हणजे, त्यापूवीर् जाहिरा यांनी चौकशी आयोग आणि राष्ट्रीय मानवी हक्क आयोगापुढे तपशिलवार तक्रार नोंदविली होती. न्यायालयात मात्र भाजपचा आमदारच त्यांना घेऊन आला आणि त्यांनी आपली साक्ष फिरविली. आता तर गुजरातेत आम्हाला न्याय मिळणार नाही, यासाठी हा खटला नव्याने मुंबईतील न्यायालयात चालवावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

बेस्ट बेकरी प्रकरणातील आरोपींची निदोर्ष मुक्तता झाल्याची गंभीर दखल घेऊन मानवी हक्क आयोगाच्या एका पथकाने सोमवारी गुजरातमध्ये जाऊन उच्च न्यायालयाच्या हंगामी मुख्य न्यायमूतीर्ंची भेट घेतली. आयोगाचा पवित्रा आणि जाहिरा यांनी खटला गुजरातबाहेर चालविण्याची केलेली मागणी, यामुळे मोदी सरकारची पुरती नाचक्की झाली आहे. मोदी सरकार अल्पसंख्याकांचे रक्षणही करू शकत नाही आणि त्यांना न्यायही देत नाही, हे सिद्ध झाले आहे. गेल्या रविवारी मुंबईतील एका कार्यक्रमात स्व. धीरूभाई अंबानी यांचा गुणगौरव करताना मोदी यांनी राज्याच्या प्रगतीचा आलेख मांडला.

परंतु ज्या राज्यात निरपराध माणसांना जिवंत जाळले जाते, बायकामुलांनाही सोडले जात नाही, अल्पसंख्य समाजाला जीव मुठीत धरून जगावे लागते, ते राज्य प्रगत कसे? सध्या गुजरातमध्ये कामगार संघटना, स्त्री

मुक्ती चळवळ, प्रबोधन आंदोलने आणि डाव्या शक्ती जवळपास नाहीत अथवा त्या क्षीण स्वरुपात अस्तित्वात आहेत. दलित, ओबीसी, आदिवासी आणि मुस्लिम यांच्या 'खाम' युतीतून उच्च जातींना शह देण्याचा काँग्रेसचा प्रयत्न काही काळच यशस्वी झाला. गुजरातमध्ये भाजपची दीर्घकाळ सत्ता असून, या काळात देशात राबविता न येणारे प्रयोग 'मोदी लॅब'मध्ये केले जात आहेत.

गुजरातमध्ये दंगली झाल्या, तेव्हा वाजपेयी यांनी अहमदाबादला जाऊन दंगलग्रस्तांचे अश्रू पुसले. परंतु अल्पसंख्याकांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी काहीएक केले नाही. जाहिरा आक्रोश करत आहेत; परंतु 'बेस्ट बेकरी केस पुन्हा ओपन करता येणार नाही,' असे गुजरातचे गृहराज्यमंत्री अमित शाह यांनी सांगून टाकले आहे! संघपरिवाराला अभिप्रेत असलेले 'हिंदुराष्ट्र' कसे असेल. याची चुणूक मोदींच्या गुजरातमध्ये पाहावयास मिळत आहे!